**"आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना" अंतर्गत ज्येष्ठ पत्रकारांना दयावयाचे मासिक अर्थसहाय्य रुपये ११,०००/-वरुन रुपये २०,०००/-इतके करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र. मावज-२०२३/प्र.क्र.२२६/कार्या-३४**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १४ मार्च, २०२४.

**वाचा :-** १) सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. माजम-२००९/प्र.क्र.५७३/प्र.क्र.१००/३४, दि. ०१.०८.२००९
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज-२०१३/ प्र.क्र.१९५/३४, दि.०२.०२.२०१९
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. पुरक-२०२१/ प्र.क्र.१४३/३४, दि.१०.०३.२०२२
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. पुरक-२०२२/ प्र.क्र.१४६/३४, दि.३१.०३.२०२२
५) संचालक वृत्त व जनसंपर्क (माहिती) यांचे पत्र क्र. वृत्त (२०२३)/मंविमंवा संघ/का-२/४२४, दि.०५ जुलै, २०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना व त्यांच्या कुटुंबियांना वैदयकीय उपचारार्थ आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी" या नावाने कल्याण निधीची स्थापना करण्यास तसेच, या निधीच्या व्यवस्थापनासाठी महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांच्या अध्यक्षतेखाली एक विश्वस्त संस्था ( ट्रस्ट) स्थापन करण्यास उक्त संदर्भ क्र. १ येथील दिनांक ०१ ऑगस्ट, २००९ रोजीच्या शासननिर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. उक्त संदर्भ क्र. ४ येथील दि. ३१ मार्च, २०२३ रोजीच्या शासननिर्णयान्वये सदरहू कल्याण निधीच्या रकमेत रुपये ३५ कोटीवरुन रुपये १५ कोटी इतकी वाढ करुन एकूण रक्कम रूपये ५० कोटी इतकी रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत ठेव म्हणून ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्येष्ठ पत्रकारांना सामाजिक सुरक्षा, सुविधा देण्याच्या दृष्टीने "आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना" अंतर्गत "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी"मधील ठेवीवरील व्याजाच्या रक्कमेतून दरमहा रुपये ११,०००/- इतके अर्थसहाय्य पात्र ज्येष्ठ पत्रकारांना उक्त संदर्भ क्र.३ येथील दि. १० मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार देण्यात येते.

२. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या द्वितीय अधिवेशनामध्ये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२१ बाबत दिलेल्या निवेदनावर दि. २५.०७.२०२३ रोजी विधानमंडळात झालेल्या चर्चेच्यावेळी दि. ९ मे, २०२३ रोजी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पुरस्कार वितरण सोहळयात मा. मुख्यमंत्री महोदयांनी बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेअंतर्गत ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा रुपये ११,०००/- ऐवजी रुपये २०,०००/- इतका सन्मान निधी देण्याची घोषणा केली होती. या घोषणेच्या अनुषंगाने अदयाप शासन निर्णय निर्गमित झाला नसल्याची बाब सन्माननीय विधानपरिषद सदस्यांनी सभागृहामध्ये उपस्थित केली असता त्यावर मा. मंत्री महोदयांनी या संदर्भातील शासन निर्णय येत्या दोन दिवसात काढण्यात येईल असे आश्वासन सभागृहास दिले आहे. या आश्वासनाच्या अनुषंगाने शासन निर्णय काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच, त्यांना सामाजिक सुरक्षा व सुविधा देण्याचा विचार करुन तसेच, वृध्दावस्थेत त्यांची हेळसांड होऊ नये म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याकरीता "आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना" या अंतर्गत अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना उक्त संदर्भ क्र.३ येथील दि.१०.०३.२०२२ रोजीच्या शासननिर्णयांन्वये देण्यात येणारे अर्थसहाय्य दरमहा रु.११,०००/- (अक्षरी रुपये अकारा हजार फक्त) वरुन दरमहा रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) इतके करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू आर्थिक सहाय्याचे वितरण करताना उक्त संदर्भ क्र.२ येथील दि.२.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात नमुद "आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना" या योजनेतील लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष, कार्यपद्धती तसेच सादर करावयाची कागदपत्रे यांची पूर्तता करण्यात यावी. तसेच, या शासन निर्णयातील निकष व कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्ष पात्र अधिस्वीकृतीधारक ज्येष्ठ पत्रकारांनाच या योजनेचा लाभ देण्यात यावा.

३. सदरहू मासिक अर्थसहाय्याची रक्कम "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी" मधील मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजाच्या रकमेतूनच अदा होईल याची तसेच, अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांची संख्या अचूक असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहील.

४. याकरीता येणाऱ्या खर्चाचा विनियोग सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.ए-६, २२२० - माहिती व प्रसिद्धी, ०१- चित्रपट, ००१ - संचालन व प्रशासन (००) (०१), प्रसिद्धी संचालक (२२२० ००४३) ३१ - सहायक अनुदान (योजनातंर्गत) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या व "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी" या अंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेतील बचत खात्यामध्ये मुदतठेव स्वरुपात गुंतविण्यात आलेल्या रुपये ५० कोटी इतक्या निधीच्या व्याजाच्या रक्कमेतून करण्यात यावा.

५. सदरहू आर्थिक सहाय्य पात्र ज्येष्ठ पत्रकारांना अदा करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने डिबीटी च्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

६. सदर निधी आहरण करणेबाबत, लेखाधिकारी यांनी आहरण व संवितरण अधिकारी तसेच उपसंचालक (लेखा) यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून कामकाज करावे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. /व्यय-४ दि. अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर निधी ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आला आहे त्याच कारणासाठी खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांनी सादर करावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३१५११०५८४८६४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJAY MAROTRAO NANDEKAR

Digitally signed by VIJAY MAROTRAO NANDEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, [illegible]

**( वि. मा. नांदेकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद .
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१४. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई
१५. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर
१६. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
१८. सर्व संबंधित संस्था व समिती सदस्य
१९. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. संचालक, (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२१. संचालक, (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, कोकण, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर
२३. सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
२४. संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८ स्टेट एम्पोरियम इमारत, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली- ११०००१
२५. वरिष्ठ सहाय्यक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, श्री.काकुले यांची इमारत, दादा वैद्य रोड, पणजी, गोवा.
२६. भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.कुटीर क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०
२७. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(इं.) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५
२८. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ३८
२९. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.
३०. बहुजन समाज पक्ष, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, भूखंड क्र. ८३-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०७४
३१. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र समिती, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल मार्ग,मुंबई-०४
३२. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, महाराष्ट्र समिती, जनशक्ती सभागृह, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३
३३. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.
३४. निवड नस्ती (का.३४), सामान्य प्रशासन विभाग